VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# २६. मिरीकर घराण्याचा इतिहास

**डॉ. अर्चना टाक**

सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख, इतिहास विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर.

अहमदनगर शहराच्या जडणघडणीचा इतिहास पाहिला असता असे दिसुन येते की, या शहराच्या जडण–घडणीस ज्याप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक घटक कारणीभूत ठरले. त्याप्रमाणेच काही कौटुंबिक घराणीही तितकीच कारणीभुत ठरलेली आहेत. त्यापैकीच एक म्हणजे मिरीकर घराणे होय. या घराण्यातील ज्ञात मुळ पुरुष विसाजीपंत यांचा उल्लेख इसवी सनाच्या सोळाव्या शतकातील कागदपत्रांत सापडलेला आहे. मराठेशाहीच्या इतिहासात या घराण्यातील कर्तबगार पुरुषांनी (रामराव नारायण, यादवराव, बाबुराव, बळवंतराव) आपले विशेष कार्यकर्तृत्व गाजविले होते. त्याकाळात या घराण्याने इतिहास घडविला. पुढे ब्रिटिशकाळात आणि नंतर स्वातंत्र्योत्तर काळात समाजसेवा व इतिहासाची चिरंतन सेवा ही क्षेत्रे मिरीकर घराण्याने व्यापुन टाकलेली दिसून येतात. सरदार काकासाहेब (व्दितीय) मिरीकर हे अहमदनगर मधील सामाजिक सुधारणा चळवळीचे प्रणेते होते. त्यांनीच नगरमध्ये सामाजिक सुधारणांना प्रारंभ केला होता. नानासाहेब (प्रथम) मिरीकर व बाबासाहेब मिरीकर यांनी अनेक क्षेत्रांत भरीव कामगिरी केली. नानासाहेबांनी (प्रथम) अहमदनगरचा इतिहास शब्दरूपाने जिवंत ठेवण्याचे काम केले तर बाबासाहेबांनी शब्दरुपाबरोबरच वस्तुररुपाचाही आधार घेऊन त्यास अधिक मूर्त स्वरुप प्राप्त करुन दिलेले दिसून येते.

सरदार बाबासाहेब मिरीकर यांनी अहमदनगरचे सामाजिक जीवन आपल्या कार्यकर्तृत्वाने फुलवून टाकले होते. संस्थात्मक स्वरुपाचे भरीव कार्य त्यांनी अहमदनगर मध्ये केले. ते मिरी गावचे जहागिरदार होते. इ.स. 1954 यावर्षी जहागिरी खालसा झाल्यानंतरही आपला गाव व गावकऱ्यांशी असलेल बांधिलकीच नातं त्यांनी कायम ठेवलं. त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य समाजसेवाकार्याला समर्पित केल. त्यांनी कुठल्यातरी एकाच क्षेत्रात कार्य केले असे नाही, तर आपल्या सहभागाने अहमदनगरच्या जीवनातील सर्वच क्षेत्रे त्यांनी पावन केलेली आहेत. ऐतिहासिक, अध्यात्मिक, सामाजिक सेवा क्षेत्रांत त्यांनी व्यापक स्वरुपाचे कार्य केलेले आहे. याचा वारसा त्यांना आपल्या पूर्वजांकडून मिळालेला होता.

मिरीकर घराणे हे ऐतिहासिक घराणे आहे. विसाजीपंत हे या जहागिरदार घराण्याचे सोळाव्या शतकातील ज्ञात मुळ पुरुष होय. ते गावचे कुलकर्णी होते. विसाजी पंतांपासून सातव्या पिढीत रामराव नारायण उर्फ तात्यासाहेब होऊन गेले. ते मिरीकर घराण्यातील आद्य पराक्रमी पुरुष होते. रामराव नारायण हे हैद्राबादच्या निजामाच्या फौजेत होते. परंतु तिथे त्यांचे बिनसल्यामुळे ते तिथुन बाहेर पडून शिदयांच्या फौजेत दाखल झाले. यावेळी मराठयांचा उत्तरेतील मुलूखगिरीचा काळ सुरु झालेला होता. ज्यावेळी जयाप्पा शिंदेंनी दिल्लीवर स्वारी केली आणि दिल्लीचा मोगल बादशहा अहमदशहा यास जेरीस आणले, त्यावेळी जयाप्पांनी दिल्ली दरबारांत आपली वकीली करण्यासाठी त्यांच्या जवळ असलेल्या एका पराक्रमी अन् मुत्सदी माणसाची नेमणूक केली. जयाप्पा शिंदेचा हा पराक्रमी, मुत्सदी माणूस म्हणजे रामराव नारायण होत. रामराव नुसते लढाईतच प्रविण होते असे नाही तर ते मुत्सदेगिरीतही,

राजशिष्टाचारातही प्रविण होते. आपल्या पराक्रमाच्या जोरावरच त्यांना त्यावेळी दिल्लीश्वराकडून मिरी, शिंगवे केशव, राजेगाव, फिरोजाबाद, दिडीभानो, वटवई व नेमाड ही गावे जहागिरीदाखल मिळाली होती.

मराठे व अहमदशहा अब्दाली यांच्यात पानिपत मध्ये जी लढाई झाली. त्या लढाईत अब्दाली विरोधात लढत असताना रामराव धारातिर्थी पडले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र यादवराव दिल्ली दरबारात शिद्यांची वकीली करु लागले. मात्र अल्पावधीतच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर नारायणराव रामराव उर्फ बाबूराव हया रामराव नारायण यांच्या दुसऱ्या पुत्राकडे शिद्यांनी दिवाणगिरी सोपविली होती. गुजरातमधील पावागडचा किल्ला त्यांना देऊन तेथील काही सरंजामी व्यवस्थाही त्यांच्यावर सोपविली होती. त्यावेळच्या राजकारणात शिंदे हे प्रभावी होते. दिल्लीच्या राजकारणावर त्यांचे विशेष लक्ष असे. त्यामुळे महादजींबरोबर बाबूरावांचेही दिल्ली येथे वरचेवर जाणे होत असे.

"बाबूराव यांचे त्यावेळच्या राजकारणांत वडिलाप्रमाणे बरेच अंग असे. दिल्ली येथेही त्यांचे बरेच वजन होते. दि. 24 मार्च सन 1744 इसवी रोजी बाबूराव हे दिल्लीहून देशी यावयास निघाले असतां दिल्लीचा बादशहा शहा आलम गाजी यांनी आपल्या हाताखालील अधिकारी लोकांस बाबूराव पंडित देशी जातात त्यांची नीट व्यवस्था ठेवून त्यांना पोहोचते करणे म्हणून ताकीद फर्मान दिले होते."

इतिहास संशोधक श्री. सुरेश यांनी लिहिलेल्या मिरीचे ऐतिहासिक दर्शन या पुस्तकात असलेल्या वरील मजकुरावरुन बाबूरावांचे शौर्य, त्यांचा मुत्सद्दीपणा यांमुळे शिंदे व दिल्ली दरबारात त्यांना प्राप्त झालेले महत्व यांची ओळख पटते.

रामरावांनी स्वकर्तृत्वाने दिल्लीपतीकडून जहागिरी प्राप्त केली होती. त्याची सनद बाबूरावांना दिली होती. त्यावेळी दिल्लीपती शहा आलम हा पेशव्यांचा मांडलिक होता. जहागिरीचा परिसर हा त्याच्या अखत्यारितला होता. त्यामुळे त्याच्याकडून शिक्कामोर्तब करुन घेऊन जहागिरीची ही सनद बाबूरावांना देण्यात आली होती. इतिहास संशोधक श्री. सुरेश जोशी यांनी आपल्या 'मिरीचे ऐतिहासिक दर्शन' या पुस्तकात सदर सनदेचा मराठी तर्जुमा पुढीलप्रमाणे दिला आहे.

"मिरी वगैरे देहे 3 अमल तालुके शेवगांव, सरकार अहमदनगर, सुभ अवरंगाबाद दहा हजार सहाशे रुपयांची उत्पन्नाची बाबूराव वा रामराव यांजला इनाम माफी तसदीक व याददास्त व तोफीरसुद्धा रहाव पाहिजे कीं फरजदान नामदार व कामगीर वजीर उमरावात व हकीमात व अमीलात मुत्सद्दी यांना कामगार दिवाणी व सुलतानी जाहगीरदारांत व करोडीयान हाल व इस्तकबील यांनी या हुजूराचे हुकुमास हरकरार ठेवण्याविषयीं कोसीस करुन देहानिहाय वंशपरंपरा त्याजकडे चालवावे. अतगीरी व वसुलीवीशी अभय जाणून हलक पेशक सुभेदारी व फौजदारी व माले ज्याहमत व सायर इस राज्यांत बेगार बाहसुला व दरोगा नाव जाबतांना सीकार व लढाई व मुकदमी व कानगोईवीशी पुजाईक होऊ नये व कुल उपसर्ग दिवाणी व मातालवत बादशाहीचे माफ समजावे येवीशी ताकीद निक्षून समजून प्रतिवर्षी नवीन सनद तलब करु नये हे फरमानवाल्यास पुरुवालीकचा ठेवू तये तारीख 1 माहे साबात सन 26 जलस रोजी लेखन झाले असे."

29 मे 1786 रोजी बाबुरावांना ही सनद मिळाली असल्याचा तर्क इतिहासकार सुरेश जोशी काढतात. पुढे हा वारसा बाबूरावानंतर त्यांचे पुत्र बळवंतराव यांच्याकडे चालत आला. त्यांचा काळ हा दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा म्हणजेच मराठेशाहीच्या अस्ताचा काळ होता. या काळात मराठी सत्ता अस्थिर होती. राज्यात बेबंदशाही माजली होती.

प्रत्येकजण आपापला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे या काळात बळवंतरावांना बऱ्याच वेळा कधी काही सरदारांचा तर कधी खुद्द पेशव्यांचाही रोष पत्करावा लागला होता. या रोषामुळे त्यांच्या जहागिरीवर अनेकदा जप्तीही आली होती. त्यांनी प्रत्येक वेळी झळ सोसून तिची सोडवणूक केली होती. मिरीकर घराण्याच्या इतिहासात बळवंतरावांना खूप काही सोसावे लागले होते. या सर्व प्रकाराला ते वैतागून गेले होते. त्यांच्या काळात मिरी येथे मार्तंड गुरु गोसावी हे सत्पुरुष वास्तव्य करत होते. त्यांना गुरु मानून, त्यांचा उपदेश घेऊन बळवंतराव अध्यात्माकडे वळले. आपले उर्वरित आयुष्य त्यांनी परमेश्वराच्या चिंतनात घालवले. त्यांनी संन्यास घेतली व नंतर समाधी घेतली. मिरीच्या स्मशानभूमीत बळवंतरावांची व मार्तंड गुरु गोसावी या दोघांचीही समाधी आहे. रामराव नारायण व बाबूराव यांच्या काळातील वैभवाचे दिवस पाहता बळवंतरावांच्या काळात मिरीकर घराण्याचे दैवच फिरले होते असे जाणवते, हा काळाचाच महिमा होता. दैवाचे हे उलटे फेरे पुन्हा सरळ करण्याची जबाबदारी त्यांचे पुत्र यशवंतराव बळवंत उर्फ काकासाहेब पहिले यांचेवर आली.

यशवंतरावांचे बालपण हे बडोद्यास त्यांच्या मामाकडे गेले. तेथेच त्यांचे शिक्षण झाले, तथापि मराठी साम्राज्याच्या अस्तकाळात आपल्या पित्याची म्हणजे बळवंतरावांची व आपल्या जहागिरीची झालेली वाताहत त्यांना समजल्यावर त्यांनी बडोदा सोडले. आपले गेलेले वैभव परत मिळविण्याच्या खटपटीतच त्यांचे आयुष्य व्यतित झाले. कॅप्टन हेन्री पॉटिंजर याची अहमदनगरचा कलेक्टर म्हणून नेमणूक झाली. त्याच्याशी यशवंतरावांचे स्नेहाचे संबंध होते. त्यांनी पॉटिंजरला आपल्या पूर्व वैभवाची कल्पना दिली आणि जे काही गेले होते त्यातील शक्य तितके परत मिळविण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावांची कारकीर्द ही गेलेले परत मिळवण्यात गेली ब्रिटीश सरकारने त्यांना समारंभपूर्वक 'सरदार' ही पदवी बहाल केली. मिरीकर घराण्यातील हे पहिले सरदार होत. त्यांच्यापासूनच मिरीकर घराण्यात इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र शामराव यशवंत उर्फ आवासाहेब दुसरे हे जहागिरदार बनले. त्यांनाही ब्रिटीश सरकारने 'सरदार' ही पदवी देऊन सन्मानित केले होते. ते मिरीकर घराण्यातील दुसरे सरदार होते. त्यांच्यानंतर घराण्याचा हा समृद्ध वारसा समर्थपणे पेलला तो यशवंतराव त्रिंबक उर्फ काकासाहेब द्वितीय यांनी, ते या घराण्यातील तिसरे 'सरदार' होते. ते बाबासाहेबांचे आजोबा होते. अहमदनगरमध्ये सामाजिक सुधारणांना त्यांनीच प्रारंभ केला. पुढील अधिकार पदांवर त्यांनी कार्य केले.

नेवासा तालुका लोकल बोर्ड – उपाध्यक्ष

नगर जिल्हा लोकल बोर्ड – सभासद

म्युनिसिपालटी – सभासद (1892–95)

मुंबई कौन्सिल – सभासद (1909)

गांव मुनसफ व मॅजिस्ट्रेट

विविध प्रकारची सार्वजनिक सेवाकार्ये त्यांनी केली. त्यांना सरकार दरबारी विशेष मान होता. गोरगरिबांत मिसळून त्यांची दुःखे ते समजावून घेत. त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत. त्या दूर करण्यासाठी त्यांना सहाय्य करत असत. त्यामुळेच सामान्य गरीब लोकांच्या मनात त्यांना आदराचे स्थान होते.

बाबासाहेबांचे वडील गोपाळराव उर्फ भैयासाहेब हे इ.स. 1905 ते इ.स. 1911 याकाळात म्युनसिपल बोर्डाचे सरकार नियुक्त सभासद होते. इ.स. 1907 ते इ.स. 1909 या काळात सॅ.बि. कमिटीचे चेअरमन म्हणून त्यांनी काम

केले होते. ते ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. नगर जिल्हयात सहकार चळवळीस त्यांनीच सुरूवात केली. ते नगर अर्बन बँकेचे संस्थापक सदस्य होते. मिरीकर घराण्यातील या चौथ्या व्यक्तीला ब्रिटीशांनी 'सरदार' या पदवीने गौरविले होते. त्यांना अल्पायुष्य लाभले.

भैयासाहेबांचे बंधू व बाबासाहेबांचे चुलते गोविंदराव उर्फ बाळासाहेब द्वितीय यांनी पुणे व सोलापूर येथे डेप्युटी कलेक्टर म्हणून काम केले होते. डेप्युटी कलेक्टर या नात्याने त्यांनी पंढरपूरच्या यात्रेत पांडुरंगाची 17 वर्षे सरकारी पूजा केली होती. ते शिर्डीच्या साईबाबांचे भक्त होते. साईचरित्रातील 22व्या अध्यायात बाळासाहेबांना साईबाबांचा अनुग्रह होता याची नोंद आहे. प्रसादराव उर्फ जनुसाहेब हे बाबासाहबांचे दुसरे चुलते वकील होते. थिऑसॉफिकल विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांनी धार्मिक विशयाचा तौलनिक अभ्यास केला होता. थिऑसॉफिस्ट म्हणून ते प्रसिद्ध होते.

नारायणराव उर्फ नानासाहेब पहिले हे बाबासाहेबांचे चुलते अहमदनगरच्या सामाजिक जीवनात आपला एक वेगळा ठसा उमटवून गेले. अनेक क्षेत्रांत त्यांनी भरीव कामगिरी केली. मराठी सारस्वाताचे सेवक, नगरमधील ज्येष्ठ इतिहास संशोधक नाथपंथाचे व ज्ञानेश्वरीचे अभ्यासक, ग्रामसुधारक, संगीततज्ज्ञ म्हणून महाराष्ट्रभर त्यांचा लौकिक पसरला होता. ब्रिटिशांकडून 'सरदार' या पदवीने सन्मानित झालेली ही मिरीकर घराण्यातील पाचवी व्यक्ती होती. त्यांच्या ग्रामसुधारणेच्या कार्याने प्रभावित होऊन ब्रिटिशांनी त्यांना 'कैसर–ए–हिंद' हा किताब दिला होता. बाबासाहेबांवर त्यांचा विशेष प्रभाव होता. ते त्यांना पित्याच्या जागी होते. मराठयांच्या इतिहासात दादोजी कोंडदेव व शिवाजी राजे यांचे जे नाते होते तेच नाते नानासाहेब पहिले व बाबासाहेब यांचे होते.

प्रशासन हा घटक कुठल्याही राज्याचे एक महत्वाचे अंग असतो. मिरीकर घराण्याचे ज्ञात मुळ पुरुष विसाजीपंतांकडे मिरी गावाची वृत्ती होती. गावाचा संपूर्ण कारभार पाहण्याचे काम त्यांच्याकडे असे. नंतरच्या काळात मिरीकर घराण्याला जहागिरी प्राप्त झाली. मधल्या काळात जरी अनेक चढ–उतार येऊन गेलेले असले तरी अगदी जहागिरदारी पद्धत खालसा होईपर्यंत त्यांनी ती सांभाळलेली दिसून येते. विसाजीपंतांचा उल्लेख इ.स. 1592 सालच्या कागदपत्रांत आढळतो. म्हणजेच इ.स. 1592 पासून ते जहागिरी खालसा होईपर्यंत म्हणजे इ.स. 1954 पर्यंत सलग 362 वर्षे मिरीकर घराणे प्रशासनात कार्यरत असल्याचे दिसून येते. अशा कर्तृत्वसंपन्न घराण्यात बाबासाहेबांचा जन्म झाला. आपल्या पूर्वजांच्या अंगी असणारे पराक्रम, मुत्सद्देगिरी, सद्सद्विवेकबुद्धी, साधुवृत्ती, सहनशीलता, निःस्वार्थीपणा, सेवावृत्ती हे गुण बाबासाहेबांच्याही रक्तात भिनले होते. त्यांचे घराणे हे ऐतिहासिक घराणे होते. निजाम, मोगल, पेशवे व ब्रिटिश यांच्या काळात त्यांनी आपली विशेष कर्तबगारी दाखवली होती. अशा प्रकारे ऐतिहासकि वारसा, अध्यात्मिक वारसा, समाजवेसेचा वारसा त्यांच्याकडे आपल्या पुर्वजांकडून चालत आलेला होता.

**संदर्भ ग्रंथ**

१) Ahmednagar District Gazetteet, Governement of Maharashtra, Mumbai.
२) गावडे प्र.ल. सेवाव्रती सरदार नानासाहेब मिरीकर, ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय प्रकाशन, अहमदनगर, 1994.
३) जोशी सु.दा. मिरीचे ऐतिहासिक दर्शन, अहमदनगर कॉलेज प्रकाशन, अहमदनगर, 1963.
४) मिरीकर रा.गो., अहमदनगर शहराचा इतिहास, ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय प्रकाशन, अहमनगर, 1986.
५) नगरपालिका शसांवासदिक स्मारक ग्रंथ 1954.